**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

दिनांक 14/08/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 07 कि.मी अंतरावरील मौजा मनसर येथे दिनांक 12/08/2021 चे 19.00 वा ते 19.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– हरीचंद जगन मरस्कोल्हे, वय 45 वर्ष, रा. मनसर त. रामटेक हे आठवडी बाजारातुन बाजार घेवून घराकडे जात असतांना आरोपी क्र. 1) राहुल कठोते हा त्याची मोपेड गाडी रोडने जोराने चालवित जात असता होता म्हणून फिर्यादी याने त्यास म्हटले की, 'बापु गाडी हळु चालव" यावरून आरोपीने त्यास शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादी हा आपले घरी निघुन गेले असता आरोपी क्र. 1) राहुल कठौते, रा. कांद्री माईन, 2) पवन कठौते व इतर 5 ते 7 रा. कांद्री माईन यांनी गैरकायदयाची मंडळीचे संगनमत करुन फिर्यादीस आरोपी क्र. 2) पवन कठौते याने चाबीचे गुच्छयानी फिर्यादीचे कपाळावर मारुन जखमी केले. तसेच ईतर आरोपीतांनी फिर्यादीला शिवीगाळ करुन हातबुक्यानी मारहाण केली तसेच जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 146, 147, 149, 323, 504 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री शिवाजी बोरकर 9552535825 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील मौजा आमडी येथे दिनांक 09/07/2021 चे 12.00 वा. दरम्यान विजय तुकारामजी मोराडे (मृतक), वय 38 वर्ष रा. शांतीनगर बजरंग चौक नागपुर हे इलेक्ट्रीक फिटिंगचे काम करण्या करीता गेले असता तेथे करंट लागुण खाली पडले असता ते जखमी झाले. त्यांना जखमी अवस्थेत आशा हॉस्पीटल येथे भरती केले असता दि. 11/07/2021 रोजी उपचारा दरम्यान दुपारी 15.00 वा. त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय तुकारामजी मोराडे, वय 35 वर्ष, रा. शांतीनगर बजरंग चौक, नागपुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री बोरकर मो.न. 9552535825 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर